महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : डीआरए-०५२१/ प्र.क्र.७१/२०२१/जाहिरात दिनांक ०४ जानेवारी, २०२२

# -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :- ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट-अ — अर्ज करण्याकरीता संधी देणेबाबत.**

ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट-अ (जाहिरात क्रमांक ०१/२०२१) करीता दिनांक २७ मे, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन वयोमर्यादेची कमाल गणना तत्कालीन शासन निर्णयानुसार करण्यात आली होती. तथापि, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अन्वये दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक १७ डिसेंबर, २०२१ (शासन निर्णयाचा दिनांक) या कालावधीत विहित कमाल वयोमर्यादा ओलांडली असेल त्या उमेदवारांसाठी अर्ज सादर करण्याची संधी देण्याचा शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे.

**२.** शासनाकडून प्रस्तुत दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे घेतेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विषयांकित संवर्गाकरीता दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत कमाल वयोमर्यादा ओलांडली असेल अशा उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार फक्त दिनांक ०१ मार्च, २०२० ते १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत वयाधिक ठरणा-या उमेदवारांनी खालीलप्रमाणे अर्ज सादर करण्याची प्रक्रिया करणे आवश्यक आहे :-

(१) अर्ज सादर करण्याचा कालावधी :- दिनांक ०४ जानेवारी, २०२२ रोजी १८.०० वाजल्यापासून दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.

(२) ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्यासाठी विहित अंतिम दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.

(३) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक १० जानेवारी, २०२२.

(४) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरावयाचा अंतिम दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

**३.** वरीलप्रमाणे विहित पद्धतीने व विहित कालावधीत अर्ज सादर करणा-या उमेदवारांनाच विषयांकित संवर्गाच्या निवडप्रक्रिये मध्ये भाग घेण्यास पात्र समजण्यात येईल.

ठिकाण : मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग